# ‘कार्यालयीन कामात मराठीचा वापर करा’

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमध्ये कार्यरत अमराठी अधिकारी व कर्मचारी वर्गाने मराठी भाषा अवगत करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. कर्मचाऱ्यांनी त्यांच्या दैनंदिन कार्यालयीन कामात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करावा, असे कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजीत सिंह देओल म्हणाले.

पंधरवड्याचे रणजीत सिंह देओल यांच्या हस्ते गुरुवारी उद्घाटन करण्यात आले. या वेळी ते बोलत होते. मराठी भाषेचे वैभव जपण्याच्या हेतूने मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे १४ ते २८ जानेवारी दरम्यान साजऱ्या करण्यात येणाऱ्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यादरम्यान निबंध स्पर्धा, काव्य लेखन स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा तसेच अभिवाचन स्पर्धेचे आयोजन केले आहे.